महाराष्ट्र वन विभाग

## मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचे कार्यालय

मायक्रो वेव्ह टॉवर, बारा बंगला एरिया, कोपरी, ठाणे (पूर्व) 400 603.
फोन : 022-25329865/ 25329642, फॅक्स 022-25329912.
Email: ccftthane@mahaforest.gov.in / ccfthane@gmail.com
Website: www.mahaforest.gov.in

ISO 9001:2008 Certified by IRQS
MGMT. SYS. RvA C 071


**विषय :** एकरेषिय (Linear) प्रकल्पांबाबत वळतेकरण क्षेत्रात कामे सुरु करणे व वृक्ष तोड करण्यासाठी परवानगी (Working Permission) देण्याबाबत.

टाटा पॉवर कंपनी यांच्या प्रस्तावित 220 KV कळवा-साल्सेट विद्युत वाहीनी टाकणे व पोहच रस्त्यासाठी 3.7496 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्ताव.

जा.क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.31/13-14/जा.क्र.160 /2022-23
ठाणे - 400 603, दिनांक - 21/06/2022.

**वाचा:-**

1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.Desk-17/NC/II/ID-12318/(52)/2001, दि.10.03.2014.
2) राज्य शासन पत्र क्र.एफ नं.एफएलडी-1214/सीआर-79/एफ-10, दि.02.09.2014.
3) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-6-एमएचबी-61/2014-बीएचओ/2465, दि.11.09.2017.
4) टाटा पॉवर कंपनी ट्रान्समिशन प्रोजेक्ट (विकास) यांचेकडील पत्र क्र.टीपी/केएस/2018-19/390, दि. 31.10.2018.
5) उपवनसंरक्षक ठाणे यांचेकडील पत्र क्र.25/FCA/27/1842, दि. 04.01.2019.
6) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-10/FCA/CR-3/13-14/934, दि.01.03.2019.
7) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.Desk-17/NC/II/ID-12318/(52)/42, दि. 10.04.2019.
8) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-6-एमएचबी-61/2014-बीएचओ/5331, दि.16.05.2019.
9) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.Desk-17/Nodal/Thane/ID-12318/(52)/1326, दि. 22.10.2021.
10) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-6-एमएचबी-61/2014-बीएचओ/9006, दि.13.12.2021.
11) उपवनसंरक्षक ठाणे यांचेकडील पत्र क्र.Desk-25/Survey/FCA/2457, दि. 25.03.2022.
12) मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचेकडील पत्र क्र.कक्ष-10/FCA/CR-31/1514/11, दि.11.04.2022.
13) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र.Desk-17/FCA/Nodal/Thane/ID-12318/(52)/150, दि. 20.04.2022.
14) टाटा पॉवर कंपनी ट्रान्समिशन प्रोजेक्ट (विकास) यांचेकडील पत्र क्र.टीपी/केएस5/Forest/2021-22/001A, दि. 25.03.2022.
15) उप वनसंरक्षक, ठाणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-25/मोजणी/एफसीए/360, दि.31.05.2022.
16) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-11-306/2014/एफसी, दि.08.08.2014.
17) केंद्र शासन पत्र क्र.एफ नं-1-306/2014/एफसी, दि.15.01.2015.

18) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014, दि.07.05.2015.

19) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ नं. 11/306/2014-एफसी Pt., दि.28.08.2015.

20) शासन परिपत्रक क्र.एफएलडी-2015/प्र.क्र.77/फ-10, दि. 01.07.2015.

**आदेश -**

ज्याअर्थी, टाटा पॉवर कंपनी मर्यादित, ट्रान्समिशन लाईन प्रोजेक्ट, विक्रोळी, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला 220 KV कळवा-साल्सेट विद्युत वाहीनी टाकणे व पोहच रस्त्यासाठी 3.7496 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्ताव. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडून अ.क्र.1 अन्वये राज्य शासनाकडे सादर झाल्यानंतर राज्य शासनाकडून अ.क्र.2 अन्वये केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, भोपाळ यांचेकडे सादर झाला होता.

आणि ज्याअर्थी, टाटा पॉवर कंपनी मर्यादित, ट्रान्समिशन लाईन प्रोजेक्ट, विक्रोळी, मुंबई यांचेकडील प्राप्त झालेला संरक्षित कांदळवन वनक्षेत्र वळतेकरण प्रस्ताव भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम, 1980 च्या मार्गदर्शक सुचनांनुसार प्रकल्प स्थळ विवक्षित (Site Specific) आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, भोपाळ यांचेकडील पत्र दिनांक 01.10.2014 अन्वये राज्य शासनाकडून मागविण्यात आलेली अधिकची माहिती अप्राप्त असल्याने केंद्र शासनाचा वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गतच्या मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद क्र.4.14 मध्ये नमूद केल्याप्रमाणे सदर प्रस्ताव केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय क्षेत्रिय कार्यालय, भोपाळ यांचेकडील अ.क्र.3 अन्वये बंद करण्यात आला.

आणि ज्याअर्थी, प्रकल्प प्राधिकरणाने अ.क्र.4 अन्वये सदर प्रस्तावाची आवश्यकता असल्याने प्रस्ताव Reopen करण्यासाठी विनंती केली होती. तद्नंतर उपवनसंरक्षक ठाणे यांनी अ.क्र.5 अन्वये व मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे अ.क्र.6 अन्वये Reopen करण्यासाठीचा प्रस्ताव शिफारशीसह अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडे सादर केला होता. त्यानंतर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांनी अ.क्र.7 अन्वये Reopen करण्यासाठीचा प्रस्ताव शिफारशीसहीत केंद्र शासनाकडे सादर केला होता. केंद्रशासनाकडून अ.क्र.8 अन्वये सदर प्रस्तावावर 1 ते 10 त्रुटी उपस्थित केल्या होत्या.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासनाकडून अ.क्र.8 अन्वये उपस्थित त्रुटींचा पूर्तता अहवाल विहीत मार्गाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचे मार्फत अ.क्र.9 अन्वये केंद्रशासनास सादर झाल्यानंतर केंद्रशासनाकडून या प्रस्तावावर विचार करुन अ.क्र.10 अन्वये काही अटी / शर्तीच्या अधिन राहून तत्वतः मंजूरी प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन पत्रातील अटी / शर्तीनुसार वनाचे प्रत्याशी मूल्य (Net Present Value), पर्यायी वनीकरण करीता प्रकल्प प्राधिकरणाने परिगणित केलेली रक्कम कॅम्पा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत केलेली आहे. तद्नंतर अ.क्र.11 अन्वये तत्वतः मान्यता पत्रातील अटी / शर्तीचा पूर्तता अहवाल

उपवनसंरक्षक ठाणे यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर मुख्य वनसंरक्षक (प्रा.) ठाणे यांचेकडून अ.क्र.12 अन्वये अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडे सादर झाल्यानंतर अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील अ.क्र.13 अन्वये केंद्रशासनास सादर झाला आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन पत्रातील अटी-शर्तीची पुर्तता झालेली असल्यामुळे प्रकल्प यंत्रणेने अ.क्र.14 अन्वये प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात वृक्षतोड करण्यास व कामे सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षाची तोड होणार असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका (St) क्रमांक 1207/2022 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 02.03.2022 रोजी पारित झालेला निर्णय तसेच CRZ Clearance बाबत केंद्र शासनाकडून दि.23.11.2025 पर्यंत मिळालेल्या मुदतवाढीबाबत उप वनसंरक्षक, ठाणे यांनी अ.क्र. 15 अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांना कळविलेले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक 04.01.2018 व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक 09.10.2018 रोजी वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

आणि ज्याअर्थी, सदर प्रस्तावात कांदळवन वृक्षाची तोड होणार असल्यामुळे प्रकल्प प्राधिकरणाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेले रिट याचिका (St) क्रमांक 1207/2022 मध्ये मा. न्यायालयाने दिनांक 02.03.2022 रोजी निर्णय पारित करुन परवानगी जारी केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन IRC norms प्रमाणे रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाकडून करणेचे आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने सदर प्रस्ताव हा विद्युत वाहीनी टाकणे (Transmission Line) करीता असल्याने IRC Norms प्रमाणे रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) लागू होत नाही, आणि जर केंद्र शासन रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) बाबत आग्रही असल्यास प्रकल्प यंत्रणा आवश्यक रक्कम वनविभागाकडे हस्तांतरीत करेल असे हमीपत्र दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 ला अनुसरुन वृक्षच्छादन वाढविणे व प्रदुषण रोखण्यासाठी प्रकल्प प्राधिकरणाने स्वतंत्र एक किंवा त्यापेक्षा जास्त रोपवाटीका तयार करून 5000 विविध प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्थानिक प्रजाती तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना मोफत वाटप करणे आवश्यक आहे. स्थानिकांना वाटप करण्यात आलेल्या रोपांबाबतचा प्रजातीनिहाय सहामाही अहवाल केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र.9 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणा प्रस्तावाच्या RoW मध्ये (Transmission Line) च्या खाली वनविभागाच्या सहायाने उंचीने लहान असलेल्या प्रजातीच्या रोपांची (मुख्यत्वे औषधी वनस्पती) लागवड / संवर्धन करण्यासाठीचा आराखडा तयार करुन वनविभागाच्या सहायाने लागवड करावयाची आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावित (Transmission Line) खाली आधीपासूनच दाट कांदळवन वृक्ष आहेत व उरलेली जागा मिठागरांनी व्याप्त केलेली आहे. त्यामुळे उंचीने लहान असलेल्या प्रजातीच्या रोपांची (मुख्यत्वे औषधी वनस्पती) लागवड करणे शक्य नाही. तथापी लागवडीसाठी दुसरीकडे क्षेत्र उपलब्ध करुन दिल्यास प्रकल्प यंत्रणा आवश्यक रक्कम वनविभागाकडे हस्तांतरीत करेल असे हमीपत्र दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी, केंद्र शासन तत्वतः मान्यता पत्रातील अट क्र.10 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने Bird Detectors / Diverters विदयुतवाहिनी Conductors च्या वरील भागावर ठराविक अंतरावर लावणेचे आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने सदर काम करण्याबाबत हमीपत्र दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी, सदर प्रकल्पास CRZ Clearance बाबत केंद्र शासनाकडील पत्र क्र. F-No.11-19/2014-IA-III, दि.21.05.2021 अन्वये मुळ परवानगीमधील अटींच्या अधिन राहून दि.23.11.2025 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच प्रकल्प यंत्रणेने CRZ Clearance मधील Part A Specific condition (I) मधील मुद्दा क्र. (ii) ची पूर्तता झाली असल्याचे उप वनसंरक्षक, ठाणे यांनी अ. क्र. 15 अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे यांना कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, वरील अ.क्र. 16 व 17 अन्वये एकरेषीय प्रकल्पा संदर्भात केंद्र शासनाने मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या आहेत. तसेच केंद्रशासनाने वरील अ.क्र.18 व 19 अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत एकरेषीय प्रकल्पांना (Linear Projects) तत्वतः मान्यता मिळाल्यानंतर काही अटींच्या अधिन राहून काम सुरु करण्यास परवानगी देणे बाबत सर्वसाधारण मान्यता दिली आहे.

आणि ज्याअर्थी, वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत नवीन रस्ते, अस्तित्वात असलेले महामार्गाचे रुंदीकरण, ट्रान्समिशन लाईन, पाण्याची पाईप लाईन, ऑप्टीकल फायबर केबल लाईन, रेल्वे लाईन इत्यादी एकरेषिय (Linear) प्रकल्पांना तत्वतः मान्यता दिल्यानंतर प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु करुन सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर तत्वतः मान्यता दिलेल्या पत्रातील आवश्यक अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणेने केल्यानंतर प्रकल्पांतर्गत वन जमिनीवरील कामे सुरु करणेसाठी परवानगी देण्याकरिता राज्य शासनाने वरील अ.क्र. 20 चे परिपत्रकातील अटीस अधीन राहून अशी परवानगी देणेसाठी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) यांना प्राधिकृत केले आहे.

म्हणून आता याव्दारे असे निर्देश देण्यात येत आहेत की, टाटा पॉवर कंपनी मर्यादित, ट्रान्समिशन लाईन प्रोजेक्ट, विक्रोळी, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेला 220 KV कळवा-साल्सेट विद्युत वाहीनी टाकणे व पोहच रस्त्यासाठी 3.7496 हेक्टर वनजमिन मागणी प्रस्तावातील केंद्रशासन तत्वतः मान्यता पत्रातील अटी / शर्ती तसेच खालील नमूद केलेल्या अटी / शर्तींच्या अधिन राहून वन जमिनीवर कामे सुरु करण्यास व झाडे तोडण्यास परवानगी (Working Permission) देत आहे.

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण क्षेत्रात कामे करण्यापुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षापुरतीच म्हणजेच दि.21.06.2023 पर्यंतच वैध (Valid) राहिल. दिनांक 22.06.2023 पासून सदर परवानगी आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल.

2) सदर प्रकल्पास केंद्रशासनाकडून अंतिम आदेश अप्राप्त आहे. तत्वत: मान्यता मिळालेल्या दिनांका पासून 6 महिन्याच्या आत प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत पालन करेल याची संबंधित उपवनसंरक्षक हे खात्री करतील. आणि वेळोवेळी याबाबतचा अहवाल सादर करतील.

3) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.8 ला अनुसरुन वृक्षच्छादन वाढविणे व प्रदुषण रोखण्यासाठी प्रकल्प प्राधिकरणाने स्वतंत्र एक किंवा त्यापेक्षा जास्त रोपवाटीका तयार करून 5000 विविध प्रजातीची रोपे जसे बांबू, फळझाडे, औषधी वनस्पती, शोभिवंत आणि स्थानिक प्रजाती तयार करण्यात यावीत व त्यातील 50% रोपे प्रकल्पांतील प्रस्तावित वनक्षेत्रा सभोवती लावणे आणि उर्वरीत 50% रोपे लागवडीसाठी स्थानिकांना मोफत वाटप करणे आवश्यक आहे. स्थानिकांना वाटप करण्यात आलेल्या रोपांबाबतचा प्रजातीनिहाय सहामाही अहवाल केंद्र शासनाचे पर्यावरण, वन आणि वातावरण बदल, मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, नागपूर यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

4) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 9 ला अनुसरून प्रकल्प यंत्रणा प्रस्तावाच्या RoW मध्ये (Transmission Line) च्या खाली वनविभागाच्या सहाय्याने उंचीने लहान असलेल्या प्रजातीच्या रोपांची (मुख्यत्वे औषधी वनस्पती) लागवड / संवर्धन करण्यासाठीचा आराखडा तयार करून वन विभागाच्या सहाय्याने लागवड करणे बंधनकारक राहील.

5) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.10 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने Bird Detectors / Diverters विदयुतवाहिनी Conductors च्या वरील भागावर ठराविक अंतरावर लावणेचे आहे. सदर काम करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

6) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र.12 ला अनुसरुन IRC norms प्रमाणे रस्ता दुतर्फा लागवड (avenue plantation) प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वनविभागाकडून करणेचे आहे. सदर बाब प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

7) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावीत वळतेकरण क्षेत्रात कामे सुरु करण्यापूर्वी, सबंधित उपवनसंरक्षक यांना कळविणे आवश्यक आहे. संबंधित उपवनसंरक्षक यांनी कामे सुरु असतांना प्रस्तावित क्षेत्रात वनभंग झाला आहे का ते तपासणे तसेच वनभंग झाला असल्यास, प्रचलित कायद्यानुसार कारवाई करावी.

8) प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वनक्षेत्रात कामे करताना नैसर्गिक पाण्याचे मार्ग नदी, नाले, पाण्याचे प्रवाह बंद होणार नाहीत. तसेच वन्यप्राणी यांचे जाण्या-येण्याचे मार्ग बंद होणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

9) जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक 04.01.2018 व जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी दिनांक 09.10.2018 रोजी वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र जारी केलेले आहे. बाबत प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक / पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन/मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील.

10) सदर प्रकल्पास CRZ Clearance बाबत केंद्र शासनाकडील पत्र क्र. F-No.11-19/2014-IA-III, दि.21.05.2021 अन्वये मुळ परवानगीमधील अटींच्या अधिन राहून दि.23.11.2025 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच प्रकल्प यंत्रणेने CRZ Clearance मधील Part A Specific condition (I) मधील मुद्दा क्र. (ii) ची पूर्तता झाली असली तरी CRZ Clearance पत्रातील उर्वरीत अटी / शर्तींची पूर्तता करणे प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहील.

11) पर्यावरण व वनमंत्रालयाने वन व वन्यजीव विकास व संवर्धन या दृष्टीने वेळोवेळी घातलेल्या व घालण्यात येणा-या इतर अटी प्रकल्प यंत्रणेस बंधनकारक राहतील.

12) प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

13) उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत केंद्रशासनाचे पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय नवी दिल्ली यांचेकडील Hand book मधील परिच्छेद क्रं. 1.21 अनुसार निविर्दीष्ट कार्यवाही करावी.

**<u>अनुसुची</u>**

| अ.क्र. | गावाचे नाव | सीटीएस / सर्व्हे क्र. | क्षेत्र हेक्टर | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|
| 1. | ऐरोली | 136, 137, 300 | 0.9390 | संरक्षित वन (कांदळवन) |
| 2. | मुलुंड | 1327, 1320A/19, 1320A/18/4, 1320A/17, 1320A, 1280, 1319Pt., 1318Pt. | 2.7356 | |
| 3. | नाहूर | 795/17, 795/27 | 0.0750 | |
| एकूण | | | 3.7496 | -- |

सदर आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयाचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच सदर आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर, सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शित करावी.

सदर आदेश महाराष्ट्र शासन वनविभागाचे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येत आहे.

(एस. व्ही. रामाराव)
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**

प्रति,

उपवनसंरक्षक ठाणे

प्रतिलिपी :- प्रधान सचिव (वने), मंत्रालय, मुंबई यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर.

**Sheetal Raut/912) 3.7496 ha. Tata Power Company-Kalwa-Salset-Working Permission**

प्रतिलिपी :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपी :- जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- मुख्य कार्यकारी अधिकारी, ठाणे यांचेकडे माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी :- टाटा पॉवर कंपनी मर्यादित, ट्रान्समिशन लाईन प्रोजेक्ट, धारावी रिसिव्हींग स्टेशन, शालीमार इंडस्ट्रीयल इस्टेट जवळ, माटुंगा, मुंबई 400 019 यांजकडे माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

2.00 निर्देशित करण्यात येते की, या संदर्भातील सर्व आदेश आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एका स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत. आणि त्याची प्रत उपवनसंरक्षक ठाणे आणि संबंधित विभागास यांना देण्यात यावी.

प्रतिलिपी :- एकरेषिय प्रकल्प निवड नस्ती, वनवृत्त कार्यालय ठाणे.

प्रतिलिपी - कक्ष-11 (तांत्रिक), वनवृत्त कार्यालय ठाणे यांचेकडे वरील आदेश शासनाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी रवाना.

sd/xxxx
**(एस. व्ही. रामाराव)**
**मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे**